# Notification
## सूचना

म्हाडा सरळसेवा भरती-२०२१ अंतर्गत वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक-टंकलेखक संवर्गात पुरेसे पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने कागदपत्र सादर करण्याच्या दुस-या टप्प्यात दि.१८.०५.२०२३ वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक-टंकलेखक  या संवर्गातील उमेदवारांना बोलाविण्यात येत आहे.

उपरोक्त नमूद वरिष्ठ लिपीक व कनिष्ठ लिपीक-टंकलेखक या संवर्गातील उमेदवारांची सूची या सूचनेसोबत म्हाडाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी सोबत आणावयाच्या कागदपत्रांची सूची म्हाडाच्या संकेतस्थळावर Recruitment 2021 - Candidates List for Document Verification - MHADA Recruitment 2021 List of Documents मध्ये प्रसिध्द करण्यात आली आहे.

कागदपत्र सादर करण्याकरीता बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी दि.१८.०५.२०२३ रोजी सकाळी ०९.०० वाजता गुलझारीलाल नंदा सभागृह, ३ रा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे सर्व मूळ कागदपत्र व स्वसाक्षांकीत प्रतीचा एक संच यासह उपस्थित रहावयाचे आहे. जे उमेदवार कागदपत्र सादर करण्याकरीता उपस्थित राहणार नाहीत त्यांना पदभरती मध्ये स्वारस्य नाही असे समजण्यात येईल व त्यांचे नावाचा विचार करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यायची आहे.

**सचिव**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**